प्रकरण क्र. : १५०९/पीडब्ल्यू/२०२५
निशाणी क्र.: ११

**<u>साक्षीदार क्र.१ यांचा उलट तपास वकील श्री. पद्मसिंह पाटील यांचे तर्फे शपथेवर पुढे सुरू:</u>**

माझे शिक्षण बी.कॉम झाले आहे. आता मी एमएक्स इंटरनॅशनल प्रा. लि. येथे कन्सलटंट म्हणून काम करते. फरार आरोपींनी जे मला अकांउट्स दिले त्या अकांउट्सवर मला डाउट आला होता. तरी मी त्यांना पैसे दिले हे खरे आहे. साक्षीदार सांगते की, त्यांनी मला धमकी दिली होती म्हणून मी पैसे दिले. हे खरे आहे की, आरोपी ज्याला अटक झाली आहे त्याला मी पूर्वीपासून ओळखत नाही. हे खरे आहे की, न्यायालयासमोरील आरोपी याला मी पूर्वी पाहिलेले नाही व मी त्याला ओळखतही नाही. हे मला माहित नाही की, कॉल वर बोलणारा व्यक्ति आणि अटक झालेला व्यक्ति हा एकच आहे की वेगळे. हे खरे आहे की, ज्या अकांउट्सवर मी पैसे पाठवले आणि ज्या व्यक्तिंच्या सांगण्यावरून पाठवले त्यांच्या बद्दल मला माहिती नाही. हे खरे आहे की माझे पैशाचे काय झाले नंतर मला माहित नाही. हे खरे आहे की, अटक आरोपीला मी पाठवलेल्या पैशांपैकी किती पैसे मिळाले हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, आरोपींपैकी केवळ एकच आरोपीला अटक झाली आहे इतर आरोपी अजूनही फरार आहे. मी पोलीसांना बोलले की इतर आरोपींना अटक करा. हे खरे नाही की, टॅक्स वाचवण्यासाठी मी ही खोटी केस दाखल केली आहे. हे खरे नाही की, मी आरोपीला फसवण्यासाठी तक्रार दाखल केली आहे.

उलट तपास पूर्ण. पुर्नतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2026.08.04 15:39:30 +0530

(आर. टी. इंगळे)
न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग),
१२ वे न्यायालय,बांद्रा, मुंबई.

दि. ०४/०८/२०२६
ठिकाण :— मुंबई